किरकोळ आणि वैयक्तिक खात्यांसाठी मायबँक इंडिया

# वारंवार विचारले जाणारे प्रश्न

## परिचय

### मायबँक इंडिया म्हणजे काय?

मायबँक इंडिया एक असे मोबाइल बँकिंग ॲप वर आधारित उपाय आहे ज्यामुळे आपल्याला कोठेही, केव्हाही आपले बँक खाते पाहण्यास मदत होते. आपल्या खात्याशी संबंधित माहिती पाहण्याचा, निधी हस्तांतरण करण्याचा, बिलची देयके भरण्याचा, इत्यादी गोष्टी करण्याचा हा एक सोयीस्कर आणि सुरक्षित मार्ग आहे.

### मायबँक इंडिया कोणाला वापरता येईल?

- मायबँक इंडिया डॉइश बँकेच्या सर्व वैयक्तिक ग्राहकांसाठी उपलब्ध आहे
- डीबी ऑनलाइनबँकिंगवर सक्रिय लॉगिन आय.डी/ पासवर्ड असलेल्या ग्राहकांना मायबँक इंडियाचा वापरता येईल
- मोबाइल हँडसेटवर इंटरनेट/ वाय-फाय कनेक्शन असणाऱ्या ग्राहकांना मायबँक इंडियाचा वापर करता येईल

## प्रारंभ करणे

### मला डॉइश बँक मोबाइल बँकिंग ॲप (माय बँक इंडिया) कसे डाउनलोड करता येईल?

आपण आपल्या डिव्हाईस वर असलेल्या ॲप स्टोअरवरून डॉइश बँकेचे मोबाइल ॲप डाउनलोड करू शकता. (ॲप्पल ॲप स्टोअर/ गुगल प्ले स्टोअर). ॲप स्टोअरमधील डॉइश बँक मोबाइल बँकिंग ॲपचे नाव 'मायबँक इंडिया' आहे.

### मायबँक इंडियाने कोणत्या डिव्हाइस आणि ओ.एस यांना समर्थन दिलेले आहे?

डॉइश बँक मोबाइल बँकिंग ॲपला आय.ओ.एस व्हर्जन 7.0 आणि त्यावरील आणि अँड्रॉइड व्हर्जन 4.4 आणि त्यावरील व्हर्जन यांनी समर्थन दिलेले आहे.

### मायबँक इंडियामध्ये लॉगिन कसे करता येईल?

आपला डीबी ऑनलाइनबँकिंग लॉगिन आय.डी आणि पासवर्ड वापरून ॲपवर आपल्याला लॉगिन करता येईल.

### माझा डीबी ऑनलाइनबँकिंग लॉगिन आय.डी अक्षम करण्यात आलेला आहे. मला मायबँक इंडियावर लॉगिन करता येईल का?

मायबँक इंडियाचा वापर फक्त सक्रिय डीबी ऑनलाइनबँकिंग वापरकर्ते करू शकतात. आपण फॉरगॉट पासवर्ड सुविधेचा वापर करून आपला डीबी ऑनलाइनबँकिंग प्रवेश सक्रिय करू शकता.

### जर मी कधीही डीबी ऑनलाइन बँकिंग चा वापर केला नसेल तर मला ॲपवर लॉगिन करता येईल का?

## लॉगिन करणे

### मला मायबँक इंडिया मध्ये लॉगिन कसे करता येईल?

- आपल्या मोबाइल फोनमध्ये मायबँक इंडिया आयकॉनवर टॅप करा
- 'लॉगिन' वर टॅप करा
- आपला डीबी ऑनलाइनबँकिंग लॉगिन आय.डी/ पासवर्ड लिहा

### ॲप टच आय.डी/ फिंगरप्रिंट वर आधारित लॉगिन वैशिष्ट्याला समर्थन देते का आणि कोणत्या डिव्हाइसना समर्थन देण्यात आलेले आहे?

मायबँक इंडिया ॲप टच आय.डी/ फिंगरप्रिंट वर आधारित लॉगिन वैशिष्ट्याला समर्थन देते

— टच आय.डी/ फिंगरप्रिंट वर आधारित लॉगिन वैशिष्ट्य व्हर्जन 4.4 आणि त्यापेक्षा जास्त व्हर्जन असलेल्या सॅमसंग डिव्हाइसेससाठी आणि व्हर्जन 6.0 आणि त्यापेक्षा जास्त व्हर्जन असलेल्या इतर अँड्रॉइड डिव्हाइसेससाठी टच आय.डी/ फिंगरप्रिंट वैशिष्ट्याला समर्थन देते

— जर डिव्हाइसला टच आय.डी/ फिंगरप्रिंट वैशिष्ट्याला समर्थन देत असेल तरच टच आय.डी/ फिंगरप्रिंट वैशिष्ट्य हे 8.0 आणि त्यापेक्षा वरील व्हर्जन असलेल्या आय.ओ.एस डिव्हाइसेससाठी समर्थित आहे

### टच आय.डी/ फिंगरप्रिंट वर आधारित लॉगिनसाठी नोंदणी कशी करता येईल?

— टच आय.डी साठी नोंदविता यावे म्हणून पहिला निकष म्हणजे डिव्हाइस मध्ये फिंगर प्रिंट नोंदविलेले असले पाहिजे, तसे नसेल तर कृपया डिव्हाइसमध्ये फिंगर प्रिंट नोंदवा

— ॲप्लिकेशन सुरू करा

— आपल्या डीबी ऑनलाइनबँकिंगचा लॉगिन आय.डी आणि पासवर्ड लिहा, 'फिंगर प्रिंट प्रमाणीकरण सक्षम करा' पर्याय निवडा

— अटी व शर्ती मान्य करा

— आपल्याला ॲप्लिकेशनमध्ये यशस्वीरित्या लॉगिन केले जाईल आणि नोंदणी पूर्ण होईल

### टच आय.डी/ फिंगरप्रिंट वर आधारित लॉगिनचा वापर करून ॲप्लिकेशनमध्ये कोणाला लॉगिन करता येईल?

ज्या डिव्हाइसवर फिंगरप्रिंट्स सक्षम केलेल्या आहेत त्यांना टच आय.डी/ फिंगरप्रिंट वर आधारित असलेले लॉगिन, मायबँक इंडियामध्ये बायोमेट्रिक प्रवेश करू देते. आम्ही आपल्याला डिव्हाइस वरील इतर कोणत्याही व्यक्तीचे फिंगरप्रिंट अक्षम करण्याची शिफारस करतो.

### टच आय.डी/ फिंगरप्रिंट वर आधारित लॉगिनसाठी नोंदणी केल्यानंतर ॲप्लिकेशनमध्ये लॉगिन कसे करता येईल?

नोंदविल्यानंतर, ॲप्लिकेशन सुरू करा लॉगिनसाठी डिव्हाइसमधील नोंदविलेले फिंगरप्रिंट वापरा.

### टच आय.डी नोंदविल्यानंतर क्रेडेन्शियल्स वापरून ॲप्लिकेशनमध्ये लॉगइन कसे करता येईल?

ॲप्लिकेशन सुरू करा, आपल्याला टच आय.डी ने लॉगिन करण्याचा पर्याय मिळेल. कॅन्सल वर टॅप करा आणि आपल्याला टच आय.डी न वापरता लॉगिन करण्याचा पर्याय मिळेल. आपल्याला लॉगिनच्या लँडिंग स्क्रीनवर नेण्यात येईल, जिथे वापरकर्त्याला क्रेडेन्शियल्स वापरुन लॉगिन करता येईल.

### टच आय.डी/ फिंगरप्रिंट वर आधारित लॉगिनसाठी नोंदणी कशी रद्द करता येईल?

ॲप्लिकेशन सुरू करा, आपल्याला टच आय.डी ने लॉगिन करण्याचा पर्याय मिळेल. कॅन्सल वर टॅप केल्यावर आपल्याला 'डी-रजिस्टर फॉर टच आय.डी' चा पर्याय मिळेल. प्रमाणीकरण करण्यासाठी नोंदविलेल्या बोटाचा वापर करून आपली टच आय.डी साठी नोंदणी यशस्वीरित्या रद्द केली जाईल.

### मी माझा लॉगिन पासवर्ड बदलल्यानंतर मला टच आय.डी/ फिंगरप्रिंट वर आधारित लॉगिनसाठी पुन्हा नोंदवायची गरज आहे का?

होय. कृपया खालील चरणांचे अनुसरण करा:

— ॲप्लिकेशन सुरू करा, आपल्याला टच आय.डी ने लॉगिन करण्याचा पर्याय मिळेल. कॅन्सल वर टॅप केल्यावर आपल्याला 'डी-रजिस्टर फॉर टच आय.डी' चा पर्याय मिळेल. प्रमाणीकरण करण्यासाठी नोंदविलेल्या बोटाचा वापर करून आपली टच आय.डी साठी नोंदणी यशस्वीरित्या रद्द केली जाईल

— नवीन लॉगिन क्रेडेन्शियल्स वापरून टच आय.डी/ फिंगरप्रिंट वर आधारित लॉगिनसाठी परत नोंदवा

## खात्याचा सारांश

### खात्याच्या सारांश पृष्ठावर ग्राहकाला काय पाहता येईल?

खात्याच्या सारांश पृष्ठावर आपल्याला आपले बँकिंग संबंध, गुंतवणूक आणि डीमॅट आलेखी (ग्राफिकल)/ सूची स्वरूपात पाहता येईल.

### कोणत्या प्रकारची खाती सारांश पृष्ठावर असतील?

सर्व सक्रिय खाती सारांश पृष्ठावर दर्शविली जातील.

## चालू/ बचत खात्यांसाठी मिनी स्टेटमेंट कसे पाहता येईल?

— ॲप्लिकेशन मध्ये लॉगिन करा आणि खात्याच्या सारांश पृष्ठावर जा
— अकाउंट्स टॅब वर टॅप करा
— आपण ज्या खात्यासाठी मिनी स्टेटमेंट पाहू इच्छिता त्यावर टॅप करा

## माझ्या खात्यातील व्यवहार कसे पाहता येतील?

— ॲप्लिकेशन मध्ये लॉगिन करा आणि खात्याच्या सारांश पृष्ठावर जा
— अकाउंट्स टॅब वर टॅप करा आणि इच्छित खात्यावर टॅप करा
— फूल स्टेटमेंट टॅब वर टॅप करा
— मागील एक आठवड्याचे, मागील 15 दिवसांचे, मागील 1 महिन्याचे, मागील 2 महिन्यांचे, मागील 3 महिन्यांचे स्टेटमेंट आपल्याला पाहता येतील
— आपल्याला स्टेटमेंट हे तारीख मर्यादेच्या (डेट रेंजच्या) आधारे पाहता येईल आणि परवानगी दिलेली तारीख मर्यादा कमाल 90 दिवस आहे

# हस्तांतरण

## ॲपमध्ये कोणत्या प्रकारची हस्तांतरणे करता येतील?

— स्वतःच्या खात्यात हस्तांतरण
— डॉइश बँक खात्यात थर्ड पार्टी खाते हस्तांतरण
— बिगर डॉइश बँक खात्यातील खात्यांमध्ये एन.ई.एफ.टी/ आर.टी.जी.एस हस्तांतरण

## मला स्वत:च्या खात्यात कसे हस्तांतरण करता येईल?

— ॲपमध्ये लॉगिन करा
— ट्रान्सफर आयकॉनवर टॅप करा
— 'विथइन डॉइश बँक' पर्याय निवडा आणि स्वतःची खाती निवडा
— तपशील लिहा आणि ट्रान्सफर वर टॅप करा
— लिहिलेले तपशील पडताळा आणि व्यवहाराचा पासवर्ड लिहा
— व्यवहार पूर्ण करण्यासाठी सबमिटवर टॅप करा

## मला डॉइश बँकेतील इतर खात्यात पैसे कसे हस्तांतरित करता येतील?

— 'विथइन डॉइश बँक' लाभार्थी अंतर्गत आपण ज्या डॉइश बँक खात्यात हस्तांतरित करू इच्छित आहात त्या खात्याची नोंदणी करा
— जर आपण आधीच नोंदणी केली असेल तर खालील चरणांचे अनुसरण करा:
— 'मायबँक इंडिया' ॲपमध्ये लॉगिन करा
— 'ट्रान्सफर्स' आयकॉनवर टॅप करा
— 'विथइन डॉइश बँक' वर टॅप करा आणि 'थर्ड पार्टी अकाउंट्स' निवडा
— लाभार्थी निवडा, व्यवहाराचा तपशील लिहा आणि 'ट्रान्सफर' वर क्लिक करा
— लिहिलेले तपशील पडताळून पहा आणि ट्रान्झॅक्शन पासवर्ड आणि ओ.टी.पी लिहून हस्तांतरण पूर्ण करा
— व्यवहार पूर्ण करण्यासाठी सबमिट वर टॅप करा

## मला भारतातील बिगर डॉइश बँक खात्यात पैसे कसे हस्तांतरित करता येतील?

— एन.ई.एफ.टी किंवा आर.टी.जी.एस द्वारे इतर कोणत्याही बँक खात्यात आपल्याला निधी हस्तांतरित करता येईल
— आपल्याला ज्या खात्यात हस्तांतरण करायचे आहे ते खाते 'आउटसाइड डॉइश बँक' लाभार्थी म्हणून नोंदवा
— 'मायबँक इंडिया' ॲपमध्ये लॉगइन करा
— 'ट्रान्सफर्स' आयकॉनवर टॅप करा
— 'आउटसाइड डॉइश बँक' वर टॅप करा आणि एन.ई.एफ.टी/ आर.टी.जी.एस निवडा
— तपशील लिहा, लाभार्थी निवडा आणि 'ट्रान्सफर' वर टॅप करा
— लिहिलेले तपशील पडताळून पहा आणि व्यवहाराचा पासवर्ड, ओ.टी.पी लिहा (ओ.टी.पी फक्त रु. 10,000 पेक्षा जास्त व्यवहारांसाठी सूचित केला जाईल)
— व्यवहार पूर्ण करण्यासाठी सबमिट वर टॅप करा

## ट्रान्सफर्स मध्ये फेव्हरेट काय असते?

आपले निधी हस्तांतरण पूर्ण करण्यासाठी फेव्हरेट हा सोपा आणि जलद पर्याय असतो. आपले वारंवार वापरले जाणारे व्यवहार एकदा फेव्हरेट म्हणून आपल्याला सेव्ह करता येईल आणि नंतर व्यवहार पूर्ण करण्यासाठी वापरता येईल.

## माझा व्यवहार मला फेव्हरेट्स म्हणून कसा सेव्ह करता येईल?

— व्यवहार पूर्ण झाल्यानंतर, आपल्याला आपल्या पुष्टीकरण पृष्ठावर (कन्फर्मेशन पेजवर) "ॲड टू फेव्हरेट" हा पर्याय मिळेल
— ओके वर टॅप करा
— हा पर्याय फक्त थर्ड पार्टी अकाउंट ट्रान्सफर आणि बिगर डॉइश बँक (एन.ई.एफ.टी आणि आर.टी.जी.एस) हस्तांतरणासाठी उपलब्ध आहे

## मला फेव्हरेट्सचा वापर करून निधी हस्तांतरण कसे सुरू करता येईल?

— व्यवहार सुरू करण्याच्या पृष्ठावर जा
— 'चूज फ्रॉम फेव्हरेट्स' अंतर्गत आपले फेव्हरेट्स निवडा

## मला हस्तांतरणाचे वेळापत्रक ठरविता येईल का किंवा पुनरावर्ती हस्तांतरण (रिकरिंग ट्रान्सफर) सेट करता येईल का?

'पे लेटर' म्हणून हस्तांतरण करण्याचा प्रकार निवडून आपल्याला हस्तांतरणाचे वेळापत्रक ठरविता येईल. आपण एक वेळ हस्तांतरण किंवा पुनरावर्ती हस्तांतरण (रिकरिंग ट्रान्सफर) यांचे वेळापत्रक ठरविता येईल.

## डॉइश बँकेतील कोणत्याही खात्यात निधीसाठी मी लाभार्थी नोंदविणे गरजेचे आहे का?

होय, डॉइश बँक खात्यात निधी हस्तांतरित करण्यासाठी आपल्याला लाभार्थी नोंदविणे गरजेचे आहे.

## जर मला आय.एफ.एस.सी.ओ कोड किंवा बँकेचे नाव आणि इतर बँकेच्या शहराचे नाव माहित असेल, तर मला बाहेरील बँकेचा लाभार्थी नोंदविता येईल का?

— आपल्याला आय.एफ.एस.सी कोड वापरुन बँकेच्या बाहेरील लाभार्थी नोंदविता येईल
— आय.एफ.एस.सी कोड पर्याय निवडा आणि 11 अंकी आय.एफ.एस.सी कोड लिहा
— ॲप लिहिलेल्या आय.एफ.एस.सी कोडची पडताळणी करेल आणि त्यानुसार तपशील प्रदर्शित करेल
— बँकेच्या बाहेरील लाभार्थीला बँकेचे नाव आणि शहर यांच्या आधारावर नोंदविता येईल
— लाभार्थीच्या बँकेचे नाव, शहराचे नाव लिहा आणि सर्च वर टॅप करा

## मला डीबी ऑनलाइन बँकिंगमध्ये नोंदविलेल्या लाभार्थ्यांचा आढावा घेता येईल का?

होय, आपल्याला डीबी ऑनलाइन बँकिंगमध्ये नोंदविलेला लाभार्थी पाहता येईल. त्याचप्रमाणे मोबाइल ॲपद्वारे नोंदविलले लाभार्थी आपल्याला डीबी ऑनलाइनबँकिंगमध्ये सुद्धा पाहता येतील.

## लाभार्थी मर्यादा म्हणजे काय?

लाभार्थी मर्यादा म्हणजे एका दिवसात लाभार्थ्याला करता येतील असे जास्तीत जास्त निधी हस्तांतरण.

## 'विथइन डॉइश बँक' खात्यात नोंदविलेल्या लाभार्थ्यांसाठी लाभार्थी मर्यादा लागू आहे का?

डॉइश बँक खात्यात नोंदविलेल्या लाभार्थ्यांसाठी लाभार्थी मर्यादा लागू नाही.

## नव्याने नोंदणी झालेल्या बँकेबाहेरील लाभार्थ्यांसाठी हस्तांतरणावर काही मर्यादा आहे का?

लाभार्थी जोडल्यापासून 24 तासांच्या कुलिंग पीरियडपर्यंत आपल्याला फक्त रु. 50,000 पर्यंतच हस्तांतरित करता येतील.

## मला नोंदविलेला लाभार्थी कोठे पाहता येईल?

लॉगिन >> हस्तांतरण >> लाभार्थी यादी अंतर्गत नोंदविलेला लाभार्थी पाहता येईल.

### मला बँकेच्या आत किंवा बाहेर पुनरावर्ती हस्तांतरण थांबविता येईल का?

होय, आपल्याला सक्रिय स्थितीत असलेले पुनरावर्ती हस्तांतरण थांबविता येईल.

### व्यवहार थांबला आहे की नाही याची पडताळणी मला कशी करता येईल?

— आपल्याला हस्तांतरण इतिहासात व्यवहार थांबला आहे की नाही याची पडताळणी करता येईल, नियोजित व्यवहार रद्द झाल्याची स्थिती दर्शवून चिन्हांकित केला जाईल

— पुनरावर्ती व्यवहारासाठी व्ह्यू डिटेल्स लिंक वर टॅप करा >> व्ह्यू स्टॉप ट्रान्झॅक्शन वर टॅप करा, थांबलेला व्यवहार दिसेल

## बिल भरणे

### मला बिल भरण्यासाठी देयक किंवा बिलर कसे नोंदविता येईल?

आपल्याला खालीलप्रमाणे बिलर नोंदविता येईल :

— ॲपवर लॉगिन करा

— पेमेंट्स वर टॅप करा

— रजिस्टर बिलर वर टॅप करा

— बिलरचे नाव (बिलर शोधण्यासाठी किमान 3 अक्षरे आवश्यक आहेत) किंवा शहर किंवा श्रेणी लिहा आणि बिलर शोधा

— बिलर निवडा आणि बिलरचे तपशील लिहा

— रजिस्टर वर टॅप करा

### बिल भरण्यासाठी देय भरण्याचे विविध पर्याय कोणते आहेत?

बिल भरण्याच्या सुविधेसाठी देय भरण्याचे दोन पर्याय उपलब्ध आहेत:

— व्ह्यू ॲंड पे: व्ह्यू ॲंड पे मध्ये आपल्याला देयके देण्यापूर्वी आपली बिले पाहता येतील. फक्त आपल्या बिलरचे तपशील नोंदवा आणि आपले बिल ऑनलाइन दिसण्याची प्रतीक्षा करा. कृपया लक्षात घ्या की बिल सादर केल्यामुळे, बिलर सामान्यत: अंशत: देयके आणि विलंब देयके स्वीकारत नाही. बिल तयार होऊन आपल्यासमोर सादर केल्यावरच देय भरता येते.

— पे ॲट वन्स: पे ॲट वन्स ही आपली बिले भरण्याची सर्वात सोपी पद्धत आहे. वास्तविक बिलाच्या आधारे आपल्याला ताबडतोब देय भरता येईल. आपल्याला फक्त एवढेच करायचे आहे की इच्छित बिलर तपशील प्रदान करावयाचा आहे आणि आपण देऊ इच्छित असलेली रक्कम लिहावयाची आहे. आपली देयके कोणत्याही बिलाशी जोडलेली नसल्यामुळे, आपल्याला कोणतीही रक्कम भरण्याचे निवडता येईल आणि असे गरजेचे नाही की आपल्या बिलात नमूद केलेली अचूक रक्कम निवडली पाहिजे. आपल्याला फक्त एवढेच करायचे आहे की बिलर नोंदवायचा आहे आणि त्यानंतर त्वरित देयके देण्यास सुरवात करावयाची आहे.

## माझ्या पुष्टीची वाट पाहत असलेली प्रेझेंटेशन बिले मला कुठे पाहता येतील?

— प्रलंबित देयकांमध्ये आपल्याला सादर केलेले बिल पाहता येईल
— सादर केलेली बिले पाहण्यासाठी कृपया खालील चरण करा
— लॉगिन >> बिल पेमेंट्स वर टॅप करा >> पेंडिंग पेमेंट्स वर टॅप करा >> सादरीकरण बिल विभाग पहा (व्हयू प्रेझेंट बिल सेक्शन)

## सादर केलेल्या बिलांसाठी मला ऑटो पे सुविधा सक्षम करता येईल का?

होय, आपल्याला व्हयू आणि पे प्रकारच्या बिलर्ससाठी ऑटो पे सुविधा सक्षम करता येईल.

## माझ्या आवडीच्या तारखेला मला माझे बिल भरण्याचे वेळापत्रक ठरविता येईल का?

— आपल्या सोयीनुसार देय भरण्याचे दोन मार्ग आहेत - पे नाऊ किंवा पे लेटर
— पे नाऊ आपल्याला आपले खाते त्वरित डेबिट करू देते. दुसऱ्या कार्यदिवशी बिलरला पैसे पाठविण्यात येतात
— पे लेटर आपल्याला भविष्यातील तारखेसाठी देय सूचना निश्चित करू देते. कृपया लक्ष असू द्या की ऑटोपे सूचना बिलाच्या देय तारखेला आपले बिल भरण्याचे वेळापत्रक ठरवतात. कोणत्याही वेळी, देय तारखेपूर्वी, आपल्याला ते देयक आधी भरता येईल किंवा नियोजित देयक त्वरित देयकात रूपांतरित करता येईल
— आपली देयके बिलरच्या खात्यात दिसण्यासाठी सुमारे 2-3 दिवस लागतात. आम्ही आपल्याला विनंती करतो की त्यानुसार देयके द्यावीत/ त्यांचे वेळापत्रक ठरवावे

# सेवा

## मायबँक इंडियामध्ये कोणत्या सेवा विनंत्या उपलब्ध आहेत?

— चेक बुकची विनंती
— डिमांड ड्राफ्टची विनंती
— वास्तविक स्टेटमेंटची विनंती
— ई-मेल स्टेटमेंट नोंदवा
— चेक थांबवा
— मुदती ठेव (फिक्स्ड डिपॉझिट) बुक करा
— आवर्ती ठेव (रिकरिंग डिपॉझिट) बुक करा